**मार्गदर्शक सूचना**

जा.क्र. कृआ/कृमावि/शेतकरी दिन/१२०९/१४
कृषि आयुक्ताल, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
दिनांक : २२ ऑगस्ट २०१४

**प्रती,**

१) **विभागीय कृषि सहसंचालक** (सर्व)------------
२) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** (सर्व)---------------
३) **कृषि विकास अधिकारी** (जिल्हा परिषद) (सर्व)-----------------
४) **प्रकल्प संचालक (आत्मा)** ------------------

**विषय – पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची जयंती राज्यात दि. २९ ऑगस्ट २०१४ रोजी शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याबाबत.**

संदर्भ - शासन निर्णय क्रमांक शेदिजा।२०१२/प्र.क्र.१५०/३अे, मंत्रालय, मुंबई-३२, दि. १६ ऑगस्ट २०१४

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये दि. २९ ऑगस्ट २०१४ रोजी राज्यात पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची जयंती राज्यात शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे. संदर्भिय शासन निर्णयात नमूद केल्यानुसार विषयांकीत प्रकरणी मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

राज्यामध्ये कामगार दिन, महिला दिन, आरोग्य दिन, अपंग दिन, कृषि दिन याप्रमाणे वेगवेगळया विभागामार्फत वेगवेगळे दिन साजरे केले जातात. तथापि, राज्यातील जनतेला आवश्यक असलेले धान्य, फळे, भाजीपाला, पुरवठा करून त्याची गरज भागविणा।या शेतक-यांसाठी कोणताही अशा विशेष दिन साजरा केला जात नाही.

महाराष्ट्रातील शेतक-यांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती खालावलेली असताना शेतक।यांची सामाजिक, आर्थिक उंची वाढविण्यासाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी भरीव कार्य केले आहे. त्यांच्या शेतक-यांसाठीच्या कार्याबद्दल त्यांना डॉक्टरेट ही पदवी बहाल करण्यात आलेली आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी शेतकरी म्हणून शेतक-यांकरिता केलेल्या भरीव कार्याचे स्मरण व्हावे व राज्यातील सर्व शेतक-यांना सन्मान म्हणून दि. २९ ऑगस्ट हा त्यांचा जन्म दिवस ‘शेतकरी दिन’ म्हणून साजरा करण्यास तसेच दि. २९ ऑगस्ट हा दिवस राज्यात प्रतिवर्षी शेतकरी दिन म्हणून साजरा करण्यास शासन संदर्भिय शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. (सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.)

शेतकरी दिन साजरा करताना जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) व कृषि विकास अधिकारी यांनी समन्वयाने जिल्हा स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करावे. तसेच तालुका स्तरावर संबंधित तालुका कृषि अधिकारी, गट विकास अधिकारी यांनी तालुका मुख्यालयांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**जिल्हास्तर –** विभागीय कृषि सह संचालक यांनी त्यांच्या अधिनस्त असलेले जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) व कृषि विकास अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून विभागातील सर्व जिल्ह्यांच्या कार्यक्रमांचे नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी.

शेतकरी दिनाच्या निमित्ताने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) आणि कृषि विकास अधिकारी यांनी पुढाकार घेऊन विभागीय कृषि सहसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करावे. त्यासाठी मा. पालकमंत्री, मा. पदाधिकारी, जिल्ह्यातील सन्माननीय लोक प्रतिनिधी, जिल्हास्तरीय अधिकारी, आत्मातंर्गत सल्लागार समितीचे जिल्हास्तरीय सदस्य, प्रगतीशील शेतकरी यांना निमंत्रीत करावे. कार्यक्रमामध्ये कृषि शास्त्रज्ञ, पुरस्कार प्राप्त शेतकरी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करावीत. या कार्यक्रमात कृषि व कृषि संलग्न क्षेत्रात उल्लेखनिय काम केलेल्या शेतकरी, व्यक्ती, संस्था, अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित करण्यात यावे. तसेच जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शन, कृषिविषयक निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन करण्यात यावे. २९ ऑगस्ट २०१४ रोजी पद्ममश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या कृषि क्षेत्रातील योगदानाबाबत स्थानिक वृत्तपत्रांमध्ये माहितीपर लेख प्रसिध्द करावेत.

**तालुकास्तर-** तालुका स्तरावरील कार्यक्रमाचे नियोजन करून व्यवस्थितरित्या शेतकरी दिन साजरा होईल यांची दक्षता उपविभागीय कृषि अधिकारी यांनी घ्यावी. त्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त सर्वच तालुक्याच्या ठिकाणी तालुका कृषि अधिकारी, गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचे मदतीने व समन्वयाने कार्यक्रमांचे नियोजन करावे. सदर कार्यक्रमाचे आयोजन तालुक्याच्या मुख्यालयात करावे.

सदर कार्यक्रमास तालुका स्तरावरील सन्माननीय लोक प्रतिनिधी, प्रगतीशील शेतकरी, तालुकास्तरीय इतर अधिकारी, आत्मातंर्गत स्थापन झालेल्या शेतकरी सल्लागार समितीचे तालुकास्तरीय सदस्य यांना निमंत्रीत करावे. कार्यक्रमानिमित्त कृषि शास्त्रज्ञ, तालुक्यातील पुरस्कार प्राप्त पुरूष व महिला शेतकरी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजीत करावीत. कृषि माहिती विषयक चित्रफिती, प्रदर्शन, स्पर्धा आणि क्षेत्रीय भेटीचे आयोजन करावे. या निमित्ताने कृषि विषयक नाविन्यपूर्ण कार्यक्रम उदा. तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, वृक्ष लागवड कार्यक्रम, बांधावरील खत वाटप, बीज प्रक्रिया, मूलस्थानी जलसंधारणाची कामे, जलपुजन इ. कार्यक्रमांचा शुभारंभ करावा.

**खर्चाचा तपशील –** शेतकरी दिन कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शेतक-यांकरिता चहापाणी, मंडप, हारतुरे, फोटो, फ्लेक्स, प्रदर्शन इ. बाबींवर होणा-या खर्चासाठी निधीची आवश्यकता असते. यासाठी खालील मुद्यावर दिलेल्या माहितीनुसार खर्च करण्यात यावा.

१) गाव पातळीवर प्रती ग्रामपंचायत किमान रू. १५००/- तालुका स्तरावर प्रत्येकी किमान रू. २५००/- व जिल्हा स्तरावर प्रती जिल्हा रू. ५०००/- याप्रमाणे खर्च करण्यात यावा.

२) सन २०१४- या वर्षी ग्रामपंचायत सतरावर २५५० ग्रामपंचायती, तालुका स्तरावर ३५६ तालुके आणि जिल्हा स्तरावर ३३ जिल्हयामध्ये शेतकरी दिन आयोजित करण्यासाठी प्रति ग्रामपंचायत रू. १५००/- याप्रमाणे २७,९०६ ग्रामपंचायतीस रू. ४,१८,५९,०००/- तालुका स्तरावर किमान रू. २५००/- याप्रमाणे ३५६ तालुक्याकरिता रू. ८,९०,०००/- तसेच

जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी शेतकरी दिन साजरा करणेसाठी प्रत्येकी रू. ५०००/- याप्रमाणे एकूण ३३ जिल्हयाकरिता रू. १,६५,०००/- आणि राज्यस्तरावर प्रचार व प्रसिध्दी करिता रक्कम रू. १५,००,०००/- असा एकंदरीत रू. ४,४४,१४,०००/- इतक्या खर्चास संदर्भिय शासन निर्णयानुसार मान्यता दिली असून त्यानुसार खर्च करावा.

३) या प्रित्यर्थ येणारा खर्च जिल्हा सतरांवर विविध योजनातील तसेच अभियानातील प्रचार व प्रसिध्दी या बाबीवर उपलब्ध असलेल्या अनुदानातून करण्यात यावा. हा खर्च भागविण्याकरिता सर्व जिल्हयातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) व कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हा स्तरावरील व तालुका कृषि अधिकारी यांनी तालुका स्तरावरील खर्च करण्याकरिता या मार्गदर्शक सूचनेनूसार कार्यवाही करावी. तसेच राज्यस्तरावर प्रचार व प्रसिध्दी करिता कृषि उपसंचालक (माहिती विभाग) कृषि आयुक्तालय यांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या रू. १५,००,०००/- निधी खर्च करावा. व हा निधी विविध अभियान/योजना मधील प्रचार व प्रसिध्दी या बाबीसाठी उपलब्ध असलेल्या निधीमधून भागविण्यात यावा. या प्रमाणे 'शेतकरी दिन' आयोजित करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयुक्तालयास  त्वरीत सादर करावा.

स्वाक्षरीत /-
**कृषि संचालक (विप्र)**
कृषि आयुक्ताल, महाराष्ट्र राज्य, पुणे-५

**प्रत- १**) मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२) कक्ष अधिकारी ३ अे, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई -३२ यांना माहितीस्तव अग्रेषित.
३) मा. आयुक्त कृषि, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांना माहितीस्तव सविनय सादर
४) पालक संचालक (सर्व)-------------------- कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- यांना माहितीस्तव तथा योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**कृषि संचालक (विप्र)**

कृषि आयुक्ताल, महाराष्ट्र राज्य, पुणे-५

**प्रत-** १) मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

२) कक्ष अधिकारी ३ अे, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई -३२ यांना माहितीस्तव अग्रेषित.

३) मा. आयुक्त कृषि, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांना माहितीस्तव सविनय सादर

४) पालक संचालक (सर्व) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- यांना माहितीस्तव तथा योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२९ ऑगस्ट, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची जयंती राज्यात शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः शेदिजा-२०१२/प्र.क्र.१५०/३-अे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
**मंत्रालय, विस्तार, मुंबई ४०० ०३२.**
तारीख: **१६ ऑगस्ट, २०१४**

***<u>वाचा-</u>***

१) कृषि आयुक्ताल याचे पत्र क्र. कृमावि/शे.दिन/ विप्र-४/ ४७१/२०१२, दि. ९जुलै, २०१२
२) कृषि आयुक्ताल याचे पत्र क्र. कृमावि/शे.दिन/विप्र-४/७६९/२०१४, दि. २५/१/२०१४.

***<u>प्रस्तावना-</u>***

राज्यामध्ये कामगार दिन, महिला दिन, आरोग्य दिन, बाल दिन, अपंग दिन, कृषि दिन याप्रमाणे वेगवेगळया विभागामार्फत वेगवेगळे दिन साजरे केले जातात. तथापि, राज्यातील जनतेला आवश्यक असलेले धान्य, फळे, भाजीपाला, पुरवठा करुन त्याची गरज भागविणा-या शेतक-यांसाठी कोणताही असा विशेष दिन साजरा केला जात नाही.

महाराष्ट्रातील शेतक-यांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती खालावलेली असताना शेतक-यांची सामाजिक, आर्थिक उंची वाढविण्यासाठी पद्यमश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांनी भरीव कार्य केले आहे. त्यांच्या शेतक-यांसाठीच्या कार्याबद्दल त्यांना डॉक्टरेट ही पदवी बहाल करण्यात आलेली आहे. पद्यमश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांनी शेतकरी म्हणून शेतक-यांकरिता केलेल्या भरीव कार्याचे स्मरणे व्हावे व राज्यातील सर्व शेतक-यांचा सन्मान म्हणून दि. २९ ऑगस्ट हा त्यांचा जन्म दिवस शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

***<u>शासन निर्णय-</u>***

दि. २९ ऑगस्ट हा दिवस राज्यात प्रतिवर्षी शेतकरी दिन म्हणून साजरा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. शेतकरी दिनाचे कार्यक्रम आयोजनासाठी शेतक-यांकरिता चहापाणी, मंडप, हारतुरे, फोटो, फ्लेक्स, प्रदर्शन इ. बाबींवर होणा-या खर्चांसाठी निधीची आवश्यकता असते. गाव पातळीवर प्रती ग्रामपंचायत किमान रु. १५००/- तालुका स्तरावर प्रत्येकी किमान रु. २५००/- तसेच जिल्हा स्तरावर प्रती जिल्हा रुपये ५०००/- याप्रमाणे खर्च करण्यात येईल.

३. सन २०१४ या वर्षी ग्रामपंचायत स्तरावर २७,९०६/- ग्रामपंचायती, तालुका स्तरावर ३५६ तालुके आणि जिल्हा स्तरावर ३३ जिल्हयांमध्ये शेतकरी दिन आयोजित करण्यासाठी प्रति ग्रामपंचायत रु. १५०० याप्रमाणे २७,९०६ ग्रामपंचायातीसाठी रु. ४,१८,५९,०००/-, तालुकास्तरावर किमान रु. २५००/- यानुसार ३५६ तालुक्याकरिता रु. ८,९०,०००/- तसेच जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी शेतकरी दिन साजरा करणेसाठी प्रत्येकी रु. ५०००/- याप्रमाणे एकूण ३३ जिल्हयांकरीता रु. १,६५,०००/-तसेच राज्यस्तरावर

प्रचार व प्रसिध्दीकरीता रक्कम रु. १५,००,०००/- असा एकंदरीत रु. ४,४४,१४,०००/- इतक्या खर्चास शासन मान्यता देत आहे.

४. प्रस्तुत खर्च आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावर उपलब्ध असलेल्या निधीतुन भागविण्यात यावा.

५. शेतकरी दिन साजरा करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना कृषि आयुक्तालयाने निर्गमित करावयात. कृषि आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदर खर्च करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८१९१६५७३३४९०१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**सिध्दार्थ चवरे**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव
४. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
७. मा.राज्यमंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव
८. सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरु
९. कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ,अकोला
११. व्यवस्थापकयीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई प्रसिध्दीच्या विनंतीसह (५ प्रती)
१३. महालेखाकार १/२, मुंबई/नागपूर.
१४. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ / विधान मंडळ ग्रंथालय (१० प्रतीसह)
१५. सर्व जिल्हाधिकारी
१६. सर्व जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१७. सर्व विभागीय आयुक्त
१८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
१९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२०. कृषि विकास अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
२१. सर्व तालुका कृषि अधिकारी
२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२३. सर्व सहसचिव / उपसचिव , कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
२४. वसंतराव नाईक, राज्य कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर
२५. वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
२६. निवडनस्ती (३ अे)